# प्रकरण चार

## लघुपाटबंधारे विभाग

**4.283 पाणी टंचाई खर्चा बाबत.**

**पंचायत समिती शेवगांव, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** निवडक महिन्यात पाणी टंचाई टँकर नुसार टाकण्यात आलेल्या खेपांचे रक्कम रुपये 2,21,20,326/- ची देयके पारित करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त देयकाचे धनादेश क्रमांक 460262 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 2,21,20,326/- रोकडवहीस खर्च नमूद आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता 1968 चे नियम 25 (2) व 27 नुसार प्रत्यक्ष पैसे घेणाऱ्या खेरीज दुसऱ्या कोणत्याही इसमाच्या नावाने धनादेश काढता येणार नाही. असे असतांना देयकामध्ये दोन वेगवेगळ्या संस्थाचे नांवे खर्च व आयकर कपात, सुरक्षा अनामत पोटी जमा असे एकत्रीत रक्कमेचे एकाच धनादेशान्वये नियमबाह्य देयक पारीत करण्यात आलेले आहे.

2) उपरोक्त पारीत देयक रक्कमेतुन देय अनुज्ञेय दराने देयकात आयकर कपातीची रक्कम रूपये 5,08,768/- कपात केलेली आहे. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण- 1009/प्र.क्र.40/कोषा-प्र-5, दिनांक 10/03/2010 नुसार विहीत मुदतीत आयकर कपातीची रक्कम शासकीय तिजोरीत जमा करुन तिमाही विवरण सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. आयकर भरणा रक्कमेच्या चलनासह अनुपालन सादर करावे.

3) उपरोक्त तपशिलात सुरक्षा अनामत पोटी रक्कम रुपये 1,38,47,101/- देयकात नमूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 52(1) नुसार ठेव शिर्षात अंर्तभुत असलेल्या रक्कमेचे हस्तांतरण करुन कोणत्याही देयकाचे पैसे देण्यात येणार नाही. तसेच नियम 59 नुसार अतिप्रदानांच्या वसुलीच्या रक्कमा हिशोबात आणण्यासाठी समायोजनाचे स्वरुप आणि दुरुस्तीची कारणे स्पष्टपणे नमुद करण्यात यावी. तथापि, तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) टँकर अदाई 70:30 प्रमाणात करणेबाबतचे पत्रक्रमांक ग्रापापु/टंचाई/96/2016, दिनांक 26/09/2016 नुसार 30 टक्केचे प्रदान अंतर्गत लेखापरिक्षण झाल्याशिवाय करु नये. तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक दिनांक 04/01/2014 नुसार टँकरची देयके अदा करतांना जिपीएस प्रणालीवर ज्या टँकरच्या फेऱ्याची नोंद होईल, त्याच फेऱ्या देयकाकरीता अनुज्ञय राहतील. असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक टंचाई/कार्या19अ/190/2015, दिनांक 27/01/2015 अन्वये निविदा धारकास पुरवठा करण्यात येणाऱ्या प्रत्येक टँकरसाठी अनामत रक्कम रुपये 2,000/- टँकर पुरवठा करण्याचे आदेश दिल्यापासुन आठ दिवसाचे आत शासनास जमा करावे लागतील. अशाप्रकारे अनामत जमा न केल्यास ती देयकातुन वजावट करुन घेण्याचे अधिकार संबंधीत तालुक्याचे गटविकास अधिकारी यांना राहतील. तसेच प्रती टँकर रुपये 500/- पर्यंत दंड करण्याचे अधिकारही गटविकास अधिकारी यांना राहील. असे असतांना रक्कम रुपये 1,92,500/- दंडासह संबंधीतांकडून वसुल करण्यात आलेली नाही रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

6) टँकर क्रमांक एम एच 15- 2371 चे माहे मार्च 2016 प्रदान देयकात मंजूर खेपा 2.50 आहे. सदर खेपांचे प्रतिदिन भाडे 134 प्रती टन प्रमाणे प्रतिदिन रक्कम रुपये 2,656.55 देय आहे. जादा प्रदान रक्कम रुपये 33,598/- वसुलपात्र ठरविण्यात येते.

7) टँकर क्रमांक एम एच 18- 1295 चे माहे मार्च 2016 प्रदान देयकात टँकरची क्षमता 13,680 असतांना 13,860 नमुद केल्याने खेपांचे प्रती दिन भाडे 134 प्रती टन प्रमाणे प्रती दिन रक्कम रुपये 1,833.12 देय आहे.

**4.284 टंचाई विभागाकडील प्रमाणके तपासता ठेकेदारास जादा प्रदान व इतर अनियमिततताबाबत.**

**पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती श्रीगोंदा सन 2016-2017 या वित्तितय वर्षाचे निवडक महिन्यांचे लेखापरीक्षण केले असता प्रमाणक क्रमांक 129/ 17/10/2016 रूपये 73,44,704/- ठेकेदार साईसहारा यांना 70 टक्के रक्कम प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाहन क्रमांक एमएच 04/4922, दिनांक 17/03/2016 चे लॉगबुक तपासता या दिवशीच्या फिरती लॉगबुकला वाहनचालक यांच्या स्वाक्ष-या नसतानाही एकूण रूपये 1,104 व दिनांक 06/05/2016 रोजी रूपये 906/- असे एकूण रूपये 2,016/- ठेकेदारास प्रदान केले आहेत. लॉगबुकवर वाहनचालक यांची स्वाक्षरी नाही म्हणजे या खेपा केलेल्या नाहीत. असे असता ठेकेदाराचे हितासाठी लॉगबुकला खेपा केल्याचे दर्शविले आहे. यामुळे ठेकेदारास रूपये 2,016/- जादा प्रदान झाले आहेत. ते वसूल करावेत.

2) वाहन क्रमांक एमएच 04/4922 ही गाडी माहे जुलै 2016 मध्ये 10, 11, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 27, 31 जुलै 2016 या दिवशी बंद आहे. खेपा न केल्यास प्रती दिन रूपये 2,000/- दंड आकारला जाईल, अशी तरतूद असताना या कालावधीचा एकूण रूपये 36,000/- दंड आकारणे आवश्यक असताना प्रत्याक्ष ठेकेदाराकडून रूपये 28,000/- दंड वसूल केला आहे. रूपये 8,000/- कमी दंड वसूल केला. तो वसूल करावा.

3) वाहन क्रमांक एमएच 16/एई/55 लॉगबुकप्रमाणे दिनांक 27, 28, 29 जुलै 2016 या दिवशी एकूण खेपा 5 दर्शवून प्रती खेप रूपये 2,188.10 प्रमाणे रूपये 10,940.50 प्रदान केले आहेत. लॉगबुक तपासता वाहनचालकाने खेप टाकल्यानंतर लॉगबुकला नियमुन दिलेल्या 2 महिला सदस्यांच्या खेपा केल्याबाबत स्वाक्ष-या घेणे बंधनकारक आहे. असे असता या दिवशीच्या लॉगबुकला फक्त एकाच सदस्याची सही आहे. 2 सदस्यांच्या सहया का घेतल्या नाहीत? 2 सदस्यांच्या सहया घेऊन दाखवाव्यात अन्यथा रूपये 10,940.50 संबंधितांकडून वसूल करुन पूर्तता दर्शवावी.

4) वाहन क्रमांक एमएच 12/डीटी/1890 ही गाडी दिनांक 11/05/2016 रोजी बंद आहे. परंतु, नियमाप्रमाणे रुपये 2,000/- दंड आकारला नाही. रूपये 2,000/- वसूल करुन पूर्तता दर्शवावी.

5) लॉगबुक तपासता ज्या महिला सदस्यांच्या लॉगबुकवर सहया करण्यासाठी नियुक्त्या केल्या आहेत, त्यांच्याच सहया लॉगबुकवर असलेबाबत खात्री करता आली नाही. नियुक्त केलेल्याच महिला सदस्यांच्या सहया असल्याची खात्री पटवावी.

6) तपासणी वर्षातील वाहनाचे लॉगबुक तपासता उदभव ते खेप टाकावयाची वाडी, वस्ती, गाव या ठिकाणाचे अंतर किती आहे, हे प्रमाणित केलेचे प्रमाणपत्र तपासणीस मिळाले नाही. त्यामुळे प्रमाणित केलेल्या अंतरापेक्षा जादा अंतर दर्शवून ठेकेदारास जादा प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी असे झाले नसलेबाबत खात्री पटवावी.

**4.285 मौजे काम्ब्रे ना.मा. तालुका मावळ गाव तलाव दुरुस्त करणे**

**पंचायत समिती मावळ, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, वडगाव मावळ कडील सन 2016-2017 चे कामाची नस्ती, अंदाजपत्रक, दरपृथकरण, मोजपाम पुस्तकातील नोंदी व प्रमाणकाची नस्तीतील प्रत यांचे लेखापरीक्षण केले असता सदरबाबत प्रमाणक क्रमांक 47, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 11,93,859/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग अधिसूचना क्रमांक 67 दिनांक 15/05/2015 अनुसार गौण खनिजाच्या वापराची स्वामित्वधनाची रक्कम भरणा केलेली आहे. परंतु, वापरापैकी खालील बाबीतील स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. सबब गौणखनिजाच्या वापराची स्वामित्वधनाची रक्कम वसूल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे. (स्वामित्वधनाची प्रती क्यु.मी.चा दर रूपये 141.34)

2) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 180 अनुसार बिल संमत करणेत आले. त्याचा प्रमाणक क्रमांक मोजमाप पुस्तिकेच्या गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक

असताना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता देयक आदा केलेनंतर लाल शाईने त्यावर कर्ण रेषा ओढणेत आलेली नाही. सदरची बाब नियमबाहय असुन त्यामुळे दुबार देयक अदा होणेची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपरं-200/प्र.क्र.180/ पंरा-5 दिनांक 31/12/2009 अन्वये कामाचे आदेश देताना दोष / उणिवा दायित्व कालावधी नमूद करणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

4) रस्ता काम ज्या जागेवर करण्यात आले, ती जागा ग्रामपंचायत मालकीची असल्याबाबत नस्तीसोबत 8अ जागेचा उतारा जोडण्यात आलेला नाही. तरी सदर जागेवर बांधकाम कसे करण्यात आले? याबाबत खुलासा करण्यात यावा.

5) कामाच्या फलकासाठी 4610 रक्कम प्रदान केली आहे. परंतु, सदरील कामाचे फोटो नस्तीसोबत नाहीत.

6) एखाद्या बाबीवर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा 25 टक्के वाढ होत असेल किंवा खर्च रुपये 5,000/- पेक्षा जादा होत असेल, तर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 114 व 118 अन्वये व निविदेमधील निविदा शर्त क्रमांक 38 नुसार कामास तांत्रिक मंजुरी देणाऱ्या सक्षम अधिका-याची निरिक्षण टिपणीव्दारे पूर्व मान्यता घेवुनच पुढील काम करावयाचे असताना या नियमाचे पालन करता विनामान्य खर्च केला आहे. परंतु, सदर बाबीस पुर्वमान्यता न घेताच वाढीव काम करण्यात आले. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम क्रमांक 120, 152 (2) तसेच नियम 153 कडे दुर्लक्ष करुन अनियमितता झाली आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून नियम 148 नुसार बांधकामाच्या प्रारंभाचा व ते पूर्ण केल्याच्या वेळेचा तसेच इतर आवश्यक अटी शर्तीचा करारनाम्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच नियम 146 व 148 नुसार करारनाम्यात संपूर्ण तपशिल देणे आवश्यक असताना तसेच नियम 116 (2) नुसार सदर करारनामा पंचायत समितीच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करणे आवश्यक आहे अन्यथा सदर करारनामा जिल्हा परिषद बंधनकारक ठरत नाही. त्यामुळे करारनामे करताना वरील तरतुदीचे योग्य पालन केलेले नाही

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/ पं.रा.8, दिनांक 15/11/2011 मधील परिच्छेद क्रमांक 5 क अन्वये गुणवत्ता तपासणी होऊन दर्जाबाबत प्रमाणित केल्याशिवाय कंत्राटदाराची बिले अदा करु नये, असे असताना प्रस्तुत प्रकरणी बाब क्रमांक 5 नुसार - steel bar 1.10.mm चाचणी केलेली नाही. सदरील साहित्याची गुणवत्ता प्रमाणित होत नाही.

**4.286 लघुपाटबंधारे विभागाकडील विहीत कालावधीत संगणक परीक्षा उत्तीर्ण नसतांना जादा अदा वेतनवाढीबाबत.**

**पंचायत समिती कुर्डुवाडी, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 अन्वये ज्यांची निवड प्रक्रिया दिनांक 01/01/2001 रोजी किंवा त्यापूर्वीपासून सुरु झालेली आहे अशा शासकीय अधिकारी / कर्मचा-यांनी नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत तसेच सध्या शासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचा-यांनी दिनांक 31/12/2007 पूर्वी परिक्षा उत्तीर्ण न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सूट देण्यात येईपर्यंतच्या कालावधीपर्यंत किंवा ते संगणक हाताळणी/ वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र उपलब्ध करून देईपर्यंत वेतनवाढी रोखण्यास पात्र ठरतील व वेतनवाढी रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही, असे नमुद केलेले आहे.

पंचायत समिती, कुर्डुवाडीच्या लघुपाटबंधारे विभागाकडील सेवापुस्तके तपासली असता 4 अधिकारी व कर्मचारी हे दिनांक 31/12/2007 मुदतीत संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत. तपशिलात नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीनंतरही अदयाप उत्तीर्ण नाहीत / विहित मूदतीनंतर संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना दिनांक 01/07/2008 ते संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकादरम्यान जादा वेतन प्रदान झाले आहे आणि होत

आहे. जे कर्मचारी संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण नाहीत / मुदतीत उत्तीर्ण नाहीत, त्यांना होत असलेले अतिप्रदान रोखून अतिप्रदानात रक्कम वसुल करणेची कार्यवाही कां केले नाही, याबाबत समर्पक खुलासा करावा. 4 कर्मचा-यांची नांवे चाचणी लेखापरिक्षणांत आढळले असून रक्कम रूपये 5,25,493/- वसूल करणे आवश्यक आहे. तसेच पंचायत समिती, कुर्डूवाडीकडील सर्व कर्मचा-यांची सेवापुस्तके तपासून जे कर्मचारी संगणक अर्हता चाचणी परीक्षा अदयाप उत्तीर्ण नाहीत किंवा उशीरा उत्तीर्ण झाले आाहेत, त्यांना होत असलेले अतिप्रदान रोखावे व अतिप्रदान रक्कमेची गणना करुन वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन करावे

**4.287 जलपुर्ती धडक सिंचन विहीर योजेनेंअंतर्गत विहीर बांधकामाच्या खर्चातील अनियमितता**

**पंचायत समिती चिखलदरा, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जलपुर्ती धडक सिंचन विहीर योजेनेअंतर्गत विहीर बांधकामावर एकुण रककम रुपये 1,65,50,049/- खर्च केले आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक योजना 2013/प्रक्र123/रोहयो-5, दिनांक 23/01/2014 अन्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या जवाहर धडक सिंचन विहीर योजनेतील प्रगती पथावरील पात्र लाभार्थ्यांच्या विहीरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वर्ग करणे व उर्वरीत विहीरीच्या अनुदानात वाढ करुन 2,50,000/- इतके केले आहेत. परंतु, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीरीचे तपशिल उपलब्ध केले नाही.

2) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक योजना 2015 /प्र.क्र. 28(3) रोहयो-5, दिनांक 27/11/2015 अन्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत घेणात येणाऱ्या धडक सिंचन विहीर योजनेतील रदद करण्यात आलेल्या विहीरी परत सुरु करण्यात आले असुन महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक योजनो 2015/प्र.क्र.28(3) अन्वये दिनांक 30/06/2017 पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक आहेत. परंतु, मार्च 2017 अखेर पुर्ण व अपुर्ण विहीरीच्या विवरण सादर केले नाहीत तसेच लाभार्थीनिहाय जलपुर्ती धडक सिंचन विहीरी योजनेअंतर्गत खर्च व महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीरीवरील खर्चाचे वर्गीकरण करुन विहीरीवरील खर्चाचे तपशिल सादर केले नाही. त्यामुळे सन 2016-2017 धडक सिंचन लाभार्थ्यास 2,50,000/- मर्यादेत मागील खर्चासह प्रदान केलेबाबत पडताळणी करता आलेली नाही.

3) पंचायत समिती, चिखलदरा येथील सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात जलपुर्ती धडक सिंचन विहीर वरील खर्चाचे अनुंषंगाने मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता, प्रत्यक्ष परिमाणापेक्षा जादा परीमाण नोंदवुन रक्कम रूपये 1,10,125/- जादा शोधन केले आहेत.

रुपये 1,10,125/- ने जादा शोधन झाले असुन जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करावी.

4) प्रभुबाई रामकिसन झामरकर यांना प्रमाणक क्रमाक 35 दिनांक 20/05/2016 अन्वये रूपये 1,78,610/- - 25,000/- = 1,53,610/- प्रदान केले आहेत. परंतु, तपासणी केले असता 1 ते 1.50 व 1.50 ते 2.00 मीटर पर्यंत माती व सॉल्ट खडकमध्ये खोदकाम केल्यांनंतर पुन्हा हार्ड रॉक मध्ये 0.50 ते 1.50 मीटर व पुढील लिटरचे मोजमाप नोंदविले. त्यामुळे त्याबाबत जबाबदारी निश्चीत करावी.

5) अंदाजपत्रकाची पडताळणी केले असता, मातीमध्ये 7.00 मीटर कठीण मुरुम 6.50 ते 6.25 मीटर व सॉल्ट रॉक 5 मीटर याप्रमाणे व्यास 5 मीटर असुन खोली 10.50 मीटरपर्यंत आहेत. लाभार्थीस मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे बंधनकारक आहेत. परंतु, 8 ते 9 मीटर व्यास घेवुन विहीरीचे मोजमाप नोंदविले. 8 ते 10 मीटर व्यास घेतलेले 9 लाभार्थी आहेत. विहीरीचे व्यास अंदाजपत्रकापेक्षा जादा घेवुन मुल्यांकनात वाढ केले विहीरीची खोली कमी होवुन उन्हाळयात विहीर कोरडे पडते व सिंचनाच्या उददेश साध्य होत नाही. विहीरीचे खोदकाम करतांना संबंधीत अभियंताचे रेखांकन करणे आवश्यक आहे. परंतु, वरील बाबी रेखांकीत करुन विहीरीचे खोदकाम केल्याचे दिसुन येत नाही.

6) रामेशवर अंबुजी गायण यांना प्रमाणक क्रमांक 5 दिनांक 03/05/2016 अन्वये रूपये 1,62,578 - 25,000 = 1,37,578/- निव्वळ प्रदान केले. मोजमाप पुस्तीकेची तपासणी केले असता मोजमाप पुस्तक क्रमांक

1,045 चे पान क्रमांक 17 चे तपासणी केले असता हार्ड मुरुम मध्ये खोदकाम 6 ते 7 मीटर 33.16 घमी. होते. परंतु, खोडतोड करुन 6 चे 7.50 केले व 49.75 घमी चे 753.10 दराने 37,466/- प्रदान केले. प्रत्यक्षात मुळ रक्कम रूपये 24,977/- होते. सबब रूपये 12,489/- बाबत जबाबदारी निश्चीत करावी.

**4.288 महात्मा फुले जल व भुमी संधारण अभियान अंतर्गत जलयुक्त शिवार विहीर पुनर्भरण योजनेच्या खर्चातील अनियमितते बाबत.**

**पंचायत समिती मोर्शी, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** महात्मा फुले जल व भुमी संधारण अभियान अंतर्गत जलयुक्त शिवार विहीर पुनर्भरण योजनेवर रककम रूपये 16,14,414/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 मधे पंचायत समितीस रुपये 6,23,282/- एवढे अनुदान प्राप्त झाले. परंतु, सदरची रक्कम सन 2015-2016 मधे पंचायत समितीने लाभार्थ्यांना वाटप केली नाही. वरिष्ठांमार्फत सदर प्रकरणासंबंधी माहिती मागविली असता पावसाळा सुरु झाल्याने रक्कम खर्च न केल्याचे कारण दर्शविल्याबाबतचे अभिलेखे नस्ती सोबत दिसून आले. परंतु, सन 2016-2017 मध्ये चक्क पावसाळ्यात रक्कम लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली. पाण्याची पातळी वाढविणे, पिकाला संरक्षीत पाणी देवून उत्पन्नात वाढ करणे, खड्ड्यात साचलेला गाळ पुन्हा शेतात वापरणे हे योजनेचे उद्दिष्ट सन 2015-2016 मध्ये पंचायत समितीने सफल केले नाही. याबाबत खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

2) ग्रामपंचायतनिहाय अनुदान वाटप केल्याबाबतचे विवरणपत्रे व लाभार्थ्यांची यादी लेखापरिक्षणास प्राप्त झाली. परंतु, लाभार्थ्यांचे अर्ज पंचायत समितीने घेतले नाही. त्यामुळे लाभार्थी निवडीचे निकष शेतकरी जॉबकार्ड धारक असावा, अल्पभुधारक असावा, ग्रामसभेच्या ठरावाद्वारे शेतक-याची निकड झालेली असावी ह्या निकषाप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही. तसेच विहिर निवडीचे निकष - विहिरीजवळून नाली, ओहोळ वाहत असेल व विहीरीचे बांधकाम पक्के असेल अशाच विहीर असणा-याना लाभ देणे आवश्यक होते. परंतु, अर्जा अभावी पडताळणी करता आली नाही.

3) सन 2015-2016 व 2016-2017 ची रक्कम रुपये 16,14,414/- खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र दिनांक 11/05/2016 रोजी पंचायत समितीने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांना प्रदान केल्याचे अभिलेखे दिसुन आले. परंतु, लाभार्थी शेतक-यांनी योजनेप्रमाणे कार्यवाही केली किंवा कसे, याबाबतचे अभिलेखे पंचायत समितीने ठेवले नाही.

**4.289 जलपुर्ती धडक सिंचन विहीर खर्चामधील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती बार्शिटाकळी, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** वित्तीय वर्षात 10 विहीरी पुर्ण केल्या असुन त्यावर रक्कम रुपये 24,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक विका/1297/प्र. क्र.81/रोहयो-10, दिनांक 01/10/1997 अन्वये आदेश दिल्यानंतर 14 महिन्याचे आंत विहीरीचे काम पुर्ण केले नाही.

2) कार्यासन अधिकारी नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) पत्र क्रमांक विहीर -2015/प्र.क्र./रोहयो -5, दिनांक 08/01/2016 तसेच उपजिल्हाधीकारी, रोजगार हमी योजना, अकोला यांचे पत्र क्रमांक/कक्ष-21/रोहयो/कली/ कावि-96/2016, दिनांक 08/01/2015 अन्वये 113 विहीरी पुर्नजिवीत केल्या आहेत. तसेच गट विकास अधिकारी बार्शी टाकळी यांना पत्र क्रमांक जावक क्रमांक/पंसअ/बांधकाम/1037/16, दिनांक 06/04/2016 अन्वये 60 विहीरींना प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे. मात्र वित्तीय वर्षात फक्त 10 विहिरी पुर्ण केल्या आहेत. विहीरीचे काम अपुर्ण राहिल्यामुळे शासकिय निधी विनाकारण गुंतुन रहीला आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिका-यांनी जातीने लक्ष घालुन विहिरीचे बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे.

3) विहीरीचा लाभ घेण्याकरीता शेतीचे क्षेत्र 0.60 हे आवश्यक असतांना श्री.संतोष वसंत चिंचोळकर यांना शेतीचे क्षेत्र 0.43 हे असुन लाभ दिला आहे. खुलासा करावा.

4) विहीरीला पाणी लागण्यापुर्वी व पाणी लागल्यानंतर भुजल सर्वेक्षण विभाग, अकोला याचे प्रमाणपत्र घेतले नाही. त्यामुळे विहीरीला पाणी लागल्याबाबत खात्री पटत नाही. प्रमाणपत्र प्राप्त करुन पुर्तता करावी.

5) पुर्ण झालेल्या विहीरीची नोंद 7/12 मध्ये घेउन अहवाल सादर करावा.

6) सादर केलेल्या विवरणपत्रानुसार एकुण 31 विहीरी अपुर्ण असुन त्यावर रुपये 40,53,037/- एवढा निधी गुंतुन पडला आहे. अकोला जिल्हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा असल्यामुळे विहीरीचे बांधकाम तातडीने पुर्ण करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही का केली नाही, याबाबत खुलासा करावा.

7) वाटर पंपचे लॉगबुक नस्तीमध्ये नसल्यामुळे किती बीएच.पी. पाणी उपसले, याबाबत पडताळणी करता आली नाही. लॉगबुकची प्रत सादर करुन पुर्तता करावी.

8) मार्गदर्शक सुचना प्रमाणे 30 टक्के अत्यल्पभुधारक, 30 टक्के इ.मा.व. व 40 टक्के कोरडवाहु अल्पभुधारक यांना लाभ दिल्याबाबत अहवाल सादर करावा.

9) शेतक-यांना विहीरीचा लाभ दिल्यामुळे त्याचे जिवनमान उंचावल्याबाबत फलश्रृती अहवाल सादर करावा.

10) लाभार्थींना इतर योजनेमधुन लाभ न दिल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

**4.290 जवाहर धडक सिंचन योजनेंतर्गत मंजुर झालेल्या विहीरीबाबत**

**पंचायत समिती मुर्तिजापूर, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नियोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक 2013/प्र.क्र.123/रो.ह-यो, दिनांक 23/01/2014 नुसार दिनांक 30/06/2014 पर्यंत विहीरी पुर्ण करणे आवश्यक होते. परंतु, नियोजन विभागाचे परीपत्रक क्रमांक योजना-2013/ प्र.क्र.123/ रो.ह.यो-5, दिनांक 29/07/2015 नुसार अपुर्ण विहीरीला मुदतवाढ देऊन दिनांक 30/06/2016 पर्यंत अपुर्ण विहीरी पुर्ण करणे आवश्यक होते विहीत कालावधीत विहीरी पुर्ण न केल्यामुळे बांधकामाच्या व मजुरीच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे लाभधारक पुन्हा अनुदान वाढवून मागू शकतात परंतु, अपूर्ण विहीरीची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे याबाबत अभिप्राय देता आला नाही.

2) पंचायत समितीने लाभधारकाला अग्रीम प्रदान करण्यात येऊन विहीरीचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही. नियोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक 2013/प्र.क्र.123/रो.ह-यो, दिनांक 23/01/2014 नुसार दिनांक 30/06/2014 नुसार ज्या लाभार्थ्यांना स्वारस्य नसेल, अशा लाभार्थ्याकडून अग्रीम वसुलीची कार्यवाही नियोजन विभागाचे शासन परीपत्रक क्रमांक भौतीक - 2013/प.क्र.29/रोहयो-5, दिनांक 16/09/2013 नुसार वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. पंचायत समितीने किती लाभधारकांना अग्रीम प्रदान केले याची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अभिप्राय देता आला नाही. अनुपालन सादर करुन खुलासा करावा.

3) धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत प्रगती पथावरील विहीरी पुर्ण करण्यासाठी देय होणारा वाटप नियोजन विभागाचे परीपत्रक क्रमांक योजना-2013/प्र.क्र.123/रो.ह.यो-5, दिनांक 29/07/2015 नुसार दिनांक 30/06/2016 पर्यंत पुर्ण करून उर्वरीत निधी तात्काळ शासन खाती भरणे आवश्यक असतांना पंचायत समितीने पुरविलेल्या माहितीच्या आधारे अभिकरण योजनेंतर्गत राबविलेल्या योजनेतील मार्च 2017 अखेर रुपये 99,18,296/- इतका निधी शिल्लक आहे. सदर शिल्लक निधी दिनांक 15/07/2016 नंतर तात्काळ शासन खाती भरणे आवश्यक असतांना भरला नाही. शिल्लक निधी योग्य लेखाशिर्षाखाली भरुन अनुपालन दर्शवून विलंबाबाबत खुलासा करावा.

ग्रामविकास विभागाचे परीपत्रक क्रमांक लेखाप-2013/प्र.क्र.81/वित्त-5, दिनांक 18/02/2014 नुसार अभिलेखे उपलब्ध करून न देणा-या अधिका-यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 च्या शिस्त व अपिल यामधील नियम 7, 8 व 10 अन्वये संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

**4.291 श्री.अरुण दा. नक्षणे, प्रयोगशाळा सहाय्यक यांचे वेतनामध्ये ग्रेड पे मध्ये वाढ करुन करण्यात आलेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती यवतमाळ, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, यवतमाळ अंतर्गत लघुसिंचन उपविभागाचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सेवा पुस्तकासह वेतन देयकाची तपासणी केली असता वेतनश्रेणी 5200-20200 ग्रेड पे 2000+200 या वेतनश्रेणीमध्ये 2200 ग्रेड पे अनुज्ञेय असतांना वेतन देयकामध्ये 2700 ग्रेड पे देण्यात आला आहे. त्यामुळे नक्षणे यांना प्रतिमाह रूपये 500/- व त्यावरील अनुज्ञेय भत्ते याप्रमाणे दिनांक 01/01/2016 ते 31/12/2016 या कालावधीमध्ये रूपये 1,23,764/- चे अतिप्रदान झाले आहे. सबब अतिप्रदानाबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करून वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

**4.292 उपविभाग सिचंन देऊळगावराजा येथे महात्मा ज्योतिबा फुले जलभूमी संधारणा अंतर्गत पाझर तलावातुन गाळ बाबतचे मूळ प्राकलन मोजमाप पुस्तिका न दर्शविणे व इतर अनियमितता.**

**पंचायत समिती देउळगाव राजा, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती, देऊळगावराजा चे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता जिल्हा परिषद सिंचन उपविभागाने महात्मा ज्योतिबा फुले जलभूमी संधारणा अंतर्गत सुरा तलाव, सिंदखेड राजा तलाव, असोला तलाव, पिंपळगाव लेंडी तलाव, नागनगाव तलाव, बेराळा तलाव, गोळेगाव तलाव यां तलावांमधून जेसीबीने गाळ काढणेसाठी रक्कम रूपये 35,95,262/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गाळ काढणे कामाचे मूळ प्राकलन सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास दर्शविली नाही. उपरोक्त कामाचे किती तास जेसीबीने गाळ काढला, त्याचे धावपुस्तंक ठेवले नाही. संबंधित तलावाची गाळ काढण्या आधीची छायाचित्रे व गाळ काढल्यानंतरची छायाचित्रे दप्तरी नाहीत. गाळ काढण्या आधीची तलावाची जलधारण क्षमता व नंतरची वाढलेली जलधारण क्षमता सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणित केलेली नाही. त्याचप्रमाणे काढलेल्या गाळाचा काय विनियोग करण्यात आला? मोघम डिझेल खरेदी करून खर्च केल्याचे आढळते. लेखापरीक्षणात सदर बाब संशयास्पद असल्याचे नमूद करण्यात येते. तलाव गाळाचा गौण खनिज भरणा तहसील कार्यालय देऊळगाव राजा येथे करण्यात आला होता किंवा काय? त्यामुळे करण्यात आलेला खर्चाची फलश्रुतीबाबत लेखापरीक्षणाला पडताळणी करता आलेली नाही.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी अन्वये देयकातुन 2.3 टक्के आयकर रक्कम रूपये 74,062/-कपात करणे आवश्यक असताना कपात केल्याचे आढळत नाही. सदर रक्कम रूपये 74,062/- वसुल करून भरणा चलान अनुपालनार्थ दर्शवावी.

3) शासन विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुबंई यांचे राजपत्र असाधारण भाग-1 दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 6 टक्के रक्कम मुल्यवर्धीत करापोटी (वॅट) कपात करणे आवश्यक असतांना कपात केल्याचे आढळत नाही. सबब रक्कम रूपये 2,15,715/- वसुल करून भरणा चलान दर्शवावी.

**4.293 विहीर बांधकामाच्या मोजमापात अनावश्यक खर्च नोंदविल्याबाबत**

**पंचायत समिती आर्वी, जिल्हा वर्धा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सन 2016-2017 च्या पंचायत समितीच्या लेखापरीक्षणात जलपूर्ती सिंचन विहिरी योजने अंतर्गत विहीर बांधकामाचे काम केल्याचे दिसून येते. 7 प्रमाणकानुसार रक्कम रुपये 17,04,077/- अंतिम प्रदान रक्कमेच्या लाभार्थीच्या नस्तीचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्रमांक रोहयो/का.अ./कावि/148/2013 दिनांक 28/05/2013 तसेच विहीर बांधकामाचे अंदाजपत्रक व करारनाम्यातील अटीनुसार वर्धा जिल्हातील लाभार्थ्याला जास्तीत जास्त 12 मी.खोल व 4.5 व्यासची विहीर बांधकाम करावयाची आहे. परंतु, उपरोक्त लाभार्थ्यांचे विहीर बांधकामाचे मोजमाप पुस्तिका तपासले असता, असे निदर्शनास आले की, विहीर बांधकामात विहिरीचा व्यास हा 4.5 मी व खोली 12

मी.पेक्षा जास्त असतांना देखील विहिरीचे जादा मुल्यांकन करून अनुदान वाटप केलेले आहे तरी 4.5 मी पेक्षा जास्तीच्या व्यासावरील व 12 मी. खोलीपेक्षा जास्त खोलीचा खर्च लेखापरीक्षास मान्य करता येत नाही.

**4.294 तलाव लिलावबाबत.**

**पंचायत समिती लाखांदूर, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,98,523/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 चे तलाव वाटप रजिस्टरला 21 तलाव वाटप केलेबाबतची नोंद असून सदर नोंदवहीवरून तलाव ठेकाची एकूण मागणी रूपये 3,25,733/- असून त्यापैकी रूपये 2,40,291/- वसूल केले असून तलाव ठेका रूपये 85,462/- शिल्लक आहेत.

2) तलाव वाटप रजिस्टरला अनुक्रमांक 3 सर्व्हे क्रमांक 143 पिपरवाही तलावाचे क्षेत्रफळ 36.42 हेक्टर दर्शविले असून रूपये 450/- प्रती हेक्टर प्रमाणे 5 वर्षाचे रूपये 81,945/- होत असून रूपये 59,688/- आकारणी केल्यामूळे रूपये 22,257/- कमी आकारणी केल्यामूळे जिल्हा निधीचे नूकसान झालेले आहे.

3) तलाव वाटप रजिस्टरवरून 21 तलावांचे दिनांक 30/06/2015 रोजी मासेमारी संस्थांचे करारनामाची मूदत संपलेली असतांनाही सन 2015-2016 मध्ये लिलाव न करता सन 2016-2017 मध्ये मागणीनूसार तलाव वाटप केल्यामूळे सन 2015-2016 वर्षाचे तलाव भाडेपट्टी रूपये 62,411/- आणि 26 तलावांचे करारनामाची मुदत दिनांक 30/06/2016 रोजी संपलेली असूनही सन 2016-2017 मध्ये तलाव लिलाव केल्याचे दिसून आले नाही. त्यामूळे सन 2016-2017 चे तलाव भाडेपट्टी रूपये 50,652/- असे एकूण तलाव भाडेपट्टी रूपये 1,13,063/- स्व-उत्पन्नापासून पंचायत समिती वंचीत राहिलेले आहेत.

4) उपरोक्त तलावांचे भूमापन क्रमांक / सात-बारा चे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नसल्यामूळे तलावांचे क्षेत्रफळ अचूक असलेबाबत लेखापरीक्षणास तपासणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मत्सवि 1213/प्र.क्र. 48/पदुम 13, दिनांक 22/10/2013 नूसार तलाव वाटप केलेले संस्था पुढील निकष पूर्तता करीत आहेत किंवा कसे, याबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

अ. संस्था ही भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था म्हणून नोंदणीकृत आहेत किंवा कसे ?

ब. तलाव वाटप करतेवेळी संस्था बंद अथवा अवसायनात आहे किंवा कसे ?

क. संस्था शासनाचे थकबाकीदार, नादार आहे किंवा कसे ?

ड. संस्थेचे अदयावत लेखापरीक्षण झाले आहे किंवा कसे ?

6) तलावांची नोंदवही ठेवलेली नसल्यामूळे पंचायत समिती लाखांदूरचे कार्यक्षेत्रात एकूण किती तलाव आहेत? पैकी किती तलांवाचे लिलाव होवून मासेमारी संस्थांना मासेमारी करीता वाटप करण्यात आले व किती तलावांचा लिलाव झालेला नाही? याबाबतचा तलावनिहाय मेळ घेता आला नाही.

**4.295 धडक सिंचन विहीरीच्या मोजमाप पुस्तीकेतील नोंदीबाबत**

**पंचायत समिती मूल, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,52,134/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 5 लाभार्थींच्या धडक सिंचन विहिरीच्या मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता काम पुर्ण झाल्यानंतरही मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेण्यात आल्याचे दिसुन आले

2) प्रथम धावते देयकात 6 मी पर्यंत खोदकाम होवुन बाब क्रमांक 6 नुसार M-15- चे काम केलेले असुन बाब क्रमांक 9 नुसार प्रथम देयकात 8 दिवस व दुसऱ्या देयकात 10 दिवस व तिसरे देयकात पुन्हा 2 दिवस Dewatring चे काम केलेले आहे. परंतु, सदर काम हे एकुण 20 दिवसांत पुर्ण झालेले असतांना 20 दिवस Dewatring चे काम कसे काय केले?

3) तसेच बाब क्रमांक 7 नुसार स्टीलचे काम केलेले आहे. उभे 8mm चे बार 70 प्रत्येक मीटर खोदकामाकरीता जादा स्टीलचा वापर झालेला आहे. तरी प्राकलनात उभे 8mm चे 40 बार ची संख्या असुन प्रत्येक लाभार्थीच्या मोजमाप पुस्तिकेत अशाचप्रकारे जादा काम नोंदवुन मुल्यांकन वाढविलेले आहे.

4) वरील लाभार्थी क्रमांक 1 च्या मोजमाप पुस्तीकेत 1st RA Bill Gl to 9 mtr खोदकाम व M-15 चे सिमेंट रिंगचे काम, 2nd RA Bill मोजमाप पुस्तीकेत 6 to 9 mtr खोदकाम व व M-15 चे सिमेंट रिंगचे काम केलेले असुन त्यापुढे कोणतेही खोदकाम नसतांना सुध्दा तिसरे अंतिम देयकात M-15 चे सिमेंट रिंगचे काम दुबार नोंदवुन रुपये 12,516/- न कामाचे मुल्यांकन वाढविलेले आहेत, तसेच लाभार्थी क्रमांक 2 च्या मोजमाप पुस्तिकेत सुध्दा वरीलप्रमाणेच रुपये 43,319/- कामाचे मुल्यांकन वाढविलेले आहे.

5) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक विहिर-2016/प्र.क्र.31/रोहयो-5, दिनांक 11/09/2016 मधील सुचना क्रमांक 1.9 चे अनुक्रमांक 9 नुसार मंजुर आकारमान टाईप प्लॉन नुसार विहीर खोदणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील, असे असतांना वरीलप्रमाणे केलेल्या टाईप प्लॉननुसार काम केलेले नाही.

6) शासन निर्णयातील सुचना क्रमांक 1.11 टप्याटप्याने पुर्ण झालेल्या कामाचे संबंधीत लाभार्थ्यास देय असलेले अनुदान त्याच्या बँक खात्यावर जमा करण्याची कारवाई करावी, असे नमुद असतांना संबंधीत लाभार्थ्याच्या बँक खात्यावर रक्कम जमा केल्याचा दस्ताऐवज नस्तीबध्द नसल्याने तपासणी करता आली

7) शासन निर्णयातील सुचना क्रमांक 1.5 नुसार भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने पाणवहाळ म्हणुन जाहीर केलेले क्षेत्र तसेच पाण्याची उपलब्धतता व पाणी पातळी चांगली असुन तेथे Water Surplus Area आहे, असा दाखला घेतल्याचे दस्ताऐवज नस्तीबध्द नाही. तसेच अनुक्रमांक 5 नुसार लाभार्थ्याच्या 7/12 चे उताऱ्यावर विहिरीची नोंद काम पुर्ण झाल्यावर घेणे बंधनकारक आहे, असे नमुद असुन सदर दस्ताऐवज उपलब्ध झालेला नसल्याने शासन निर्देशाचे उललंघन झालेले आहे.

8) तसेच टाईप प्लॉननुसार Above Ground level वर 0.75 मी. उंची असलेल्या RCC Steining M-15 CC मध्ये करणे आवश्यक आहे, जेणेकरुन पावसाळ्यात बाहेरील पाण्यासह गाळ विहिरीत जाणार नाही. तरी वरील लाभार्थीचे मोजमाप पुस्तिकेत अशा प्रकारची नोंद घेतलेली नसल्याने प्रत्यक्षात सदर काम केले नसल्याचे स्पष्ट होते.

9) वरील लाभार्थीचे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी एक सारख्याच असुन एकाच म्हणजे 9 मी. पर्यंत खोदकाम व इतर काम केलेले आहे, तरी टाईप प्लॉन नुसार 10.5 मी पर्यंत खोदकाम करणे आवश्यक असतांना केलेले नाही. तरी वरीलप्रमाणे खोदकाम केल्यानंतर त्या पातळीवर पाणी लागलेले असुन लाभार्थीचे शेतीचे क्षेत्राला मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होत असल्याबाबत भुजल सर्वेक्षण यंत्रणा इत्यादी संबंधीत संस्थेचा अहवाल सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 5 दिनांक 15/09/2017 अन्वये सादर करण्यास सांगितले. तसेच वरील नमुद मुद्यांचा खुलासा करण्यास सांगितले असतांना सुध्दा कोणतेही समर्पक उत्तरे योग्य दस्ताऐवजासह सादर न केल्याने नियमाप्रमाणे काम केल्याचे तसेच पाणी लागल्याचे स्पष्ट होत नाही.

**4.296 तलाव लिलाव करनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती राजुरा, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 10,024/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मत्सवि 1213/प्र.क्र. 48/पदुम13, दिनांक 05/12/2013 मधील परीच्छेद क्रमांक 12 मधील तक्तानूसार प्रतिवर्ष रूपये 450/- प्रमाणे तलाव ठेका रक्कम आकारलेली नाही. त्यामूळे जिल्हा निधीचे एकूण रूपये 6,824/- नूकसान झालेले आहे.

2) महाराष्ट्र शासन कृषी, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मत्सवि 1213/प्र.क्र. 48/पदुम 13, दिनांक 05/12/2013 मधील परीच्छेद क्रमांक 13 नूसार मासेमारीकरीता तलाव वाटप केलेल्या मच्छिमार संस्था, खाजगी उदयोजक यांचे सोबत रूपये 200/- मूद्रांक शूल्काचे स्टॅम्प पेपरवर

करारपत्र केलेले नाहीत. त्यामूळे लिलावाने वाटप 16 तलावाचे रूपये 200/- प्रमाणे रूपये 3,200/- चे शासन महसूलाची हानी झालेली आहे.

3) सहायक आयुक्त मत्स्यवसाय, चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक 1426 दिनांक 01/07/2016 नूसार चूनाळा (धनकरबोडी), बामनवाडा, विहिरगाव (गावतलाव) व चनाखा इत्यादी तलावांचे मच्छिंद्र मत्स्यपालन सहकारी संस्था, राजूरा यांना वाटप करनेबाबतची शिफारस केलेली असून उर्वरीत तलाव महाराष्ट्र शासन कृषी, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि 1999/20/प्र.क्र.8/पदुम 13, दिनांक 15/10/2001 मधील परीच्छेद क्रमांक 3 आणि सम शासन निर्णय दिनांक 05/12/2013 मधील परीच्छेद 3.3 नूसार जाहिर निविदा मागवून (स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमान पत्रात प्रसिध्दी देउन) जाहिर निविदेव्दारे ठेक्याने दिलेले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मत्सवि 1213/प्र.क्र. 48/पदुम 13, दिनांक 05/12/2013 मधील परीच्छेद क्रमांक 3.5 नूसार उपरोक्त तलावाचा ठेका कालावधी पाच वर्ष देणे आवश्यक असतांना एकाच वर्षाकरीता वाटप केले आहे.

5) तलावांचे भूमापन क्रमांक/सात-12 चे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नसल्यामूळे तलावांचे क्षेत्रफळ अचूक असलेबाबत लेखापरीक्षणास तपासणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मत्सवि 1213/प्र.क्र. 48/पदुम 13, दिनांक 22/10/2013 नूसार तलाव वाटप केलेले संस्था निकष पूर्तता करीत आहेत किंवा कसे, याबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

7) तलावांची नोंदवही ठेवलेली नसल्यामूळे पंचायत समिती राजूराचे कार्यक्षेत्रात एकूण किती तलाव आहेत पैकी किती तलांवाचे लिलाव होवून मासेमारी संस्थांना मासेमारी करीता वाटप करण्यात आले व किती तलावांचा लिलाव झालेला नाही? याबाबतचा तलाव निहाय मेळ घेता आला नाही.

**4.297 11000 सिंचन विहिरींचा कार्यक्रमावरील अनियमित खर्चाबाबत तसेच झालेले जादा प्रदान**

**पंचायत समिती सिरोंचा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,30,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलपमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय दिनांक 11/09/2016 नुसार बाब क्रमांक (1.5) मधील 1 व 2 चे पालन केलेले नाही. लाभार्थी निवड समिती बाब क्रमांक (1.6) प्रमाणे प्राथम्यक्रम ठरवून तालुका स्तरावरील समितीने तालुकानिहाय लक्षांक निश्चित केल्याबाबत अभिलेख दिसून आला नाही. परिशिष्ठ अ प्रमाणे प्रथम 20 टक्के काम लाभार्थ्याने पूर्ण केल्यावर अनुदानाची अदायगी 5 टप्पे आखून पहिल्या टप्याची रक्कम रूपये 50,000/- वाटप करणे अनिवार्य असताना त्यापेक्षा जादा रक्कम रूपये 2,80,000/- लाभार्थ्याची मागणी नसताना शाखा अभियंत्याने मोजमाप दर्शवून अनियमित प्रदान केले आहे.

2) मंजूर अंदाजपत्रकानुसार व मंजूर आकारमानानुसार विहीर खोदणे बंधनकारक असताना बाबक्रमांक 1 ते 5 विहिरीचे काम न करताच बाब क्रमांक 6 प्रमाणे फक्त इनवेल बोअरचे काम केल्याबाबत अभियंत्याने मोजमाप केले आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कायमस्वरूपी उपाययोजना हा उद्देश साध्य न झाल्याने लाभार्थी निवड निकषानुसार झालेले नाही. शासन निर्णय दिनांक 11/09/2016 बाब (1.9) प्रमाणे लाभार्थ्याची जबाबदारी अनुक्रमांक 8 नुसार सर्व प्रथम विहिरीचे बांधकाम स्वतः / मजुराद्वारे / अन्य पर्यायी साधनांच्या (जेसीबी/पोकलेन सारख्या मशीन्स) सहाय्याने पूर्ण करावयाच्या आहेत. तसेच अनुक्रमांक 9 नुसार मंजूर आकारमानानुसार विहीर खोदणे लाभार्थ्यास बंधनकारक असताना या बाबीकडे संपूर्ण दुर्लक्ष करून विहिरीचे कोणतेही काम न करताच फक्त इनवेल बोअर तयार केल्याबाबत भास करून (लाभार्थ्याने इनवेल बोअर केल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा नसताना) तांत्रिक अधिकाऱ्याने प्रकलानातील मंजूर बाबीपेक्षा जादा परीमाण तसेच दरात तफावती करून मोजमाप दर्शविण्यात आले व त्यानुसार प्रथम अग्रिम प्रदान केले. विहिरीचे बांधकामच नसताना फक्त इनवेल बोअर तयार करणे म्हणजे

फक्त प्राप्त अनुदान केवळ खर्ची घालण्याचा हेतू दिसून येतो. त्यामुळे या बाबीकडे शासन निर्णयातील बाब क्रमांक (1.6)नुसार लाभार्थी निवड समित्यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

3) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 5 प्रमाणे आगाऊ रक्कम देता येत नसताना खर्च प्रमाणकान्वये प्रथम अग्रिम प्रदान म्हणून दर्शविले. अग्रिम नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तांत्रिक अभियंत्याने इनवेल बोअर केल्याबाबत मोजमाप केलेले असताना प्रथम अग्रिम हा शब्दप्रयोग केल्याने प्रत्यक्षात कामे न करताच रक्कम खर्ची घातल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे झालेल्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात अफरातफर असल्याचे स्पष्ट होते.

**4.298 सिमेंट बंधारा गोलापांगरी कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती जालना, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** सिमेंट बंधारा गोलापांगरी कामाकरिता रक्कम रुपये 4,79,050/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे 5 (ब) व शासन महसुल व वन विभाग, परिपत्रक क्रमांक एस.टी.पी/1066/240/74एस, दिनांक 17/02/1972 नुसार करारनाम्यावर दोन साक्षीदाराची नावे व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही न केल्यामुळे करारनाम्याच्या विधी ग्राह्यतेची खात्री पटविणे आवश्यक आहे. तसेच करारनामा हा दिनांकीत केलेला नाही. सदरील करारनामा कोणी व कोणास कोणासाठी लिहुन दिलेला आहे, याची खात्री पटत नाही.

2) गुणवत्ता प्रमाणपत्रावर व काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रावर अधिकृतरीत्या जावक क्रमांक, दिनांक नमुद करण्यात आलेला नाही. त्यामुळे साहित्य गुणवत्तेसंबंधी खात्री करता येत नाही. खुलासा करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम 20 प्रमाणे प्रदान रक्कमेची पोहच पावती होणे आवश्यक आहे. तसेच प्रदानाचा धनादेश वितरण करतेवेळी संबंधीत कंत्राटदार / संस्थाच्या सचिवाची मुद्रांक तिकिटे लावुन स्वाक्षरी होणे आवश्यक आहे. कंत्राटदाराची मोजमापाची नोंदी व मुल्यांकन मान्य असल्याची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. पुर्तता करावी.

4) प्रस्तावित कामे हे अन्य कोणत्याही योजनेत समाविष्ट नसल्याची खात्री करुनच मान्यता द्यावी. असे असतांना अशी कार्यवाही किंवा प्रमाणपत्र संचिकेत आढळुन आलेले नाही. खुलासा करावा.

5) नियोजित कामाच्या ठिकाणी सुरवातीस व शेवटी कामाविषयी शासन परिपत्रक निर्णय क्रमांक जि.प/ 2009प्र.क्र.80/पंरास-8, दिनांक 31/12/2009 अन्वये फलक लावणे बंधनकारक आहे, अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. खुलासा करावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118(3) व नियम 153 नुसार अंदाजपत्रकातील परिणामापेक्षा अधिक परिमाणे करता येत नाही. असे असतांना प्रत्यक्ष कामावरील परिमाणामध्ये कमी / अधिक प्रमाण करुन काम पुर्ण करण्यात आलेले आहे. खुलासा करावा.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 प्रमाणे ब-1 निविदेच्या प्रत्येक पानावर गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या असणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक जी.आर34/का-4/516, दिनांक 09/01/1987 नुसार सिमेंट खडी, वाळु, वीट इत्यादीचा चाचणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडुन होणे आवश्यक असतांना अशी चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

9) शासन निर्णय क्रमांक मातसे/नस्ती/2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार रूपये 3 लक्ष पेक्षा अधिक खर्चाच्या कामाच्या ई-निविदा कार्यप्रणाली लागु करावी, अशा सुचना आहेत. सदर निर्णयानुसार दिनांक 26/11/2014 पासुन रूपये 3 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या निविदा प्रक्रियेचा अवलंब केलेला नाही. असे असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

10) मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 चे नियम 22/ अनुसुची 1 मधील दर व शासन निर्णय क्रमांक गौखनि10/0206/प्र.क्र.57ख, दिनांक 11/02/2010 नुसार प्रती घनमीटर रूपये 70.67 प्रमाणे रॉयल्टी वसुल

करणे आवश्यक आहे. सदर कामात बाब क्रमांक 6 सी.सी.एम-100 चे 187.24 घ.मी. काम झालेले आहे. सदर बाबीतील रेती व वाळूची रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. रॉयल्टी कपात केलेली नाही. तरी 187.24 X 1.41 X 70.67 = रूपये 18,657/- रॉयल्टी वसूल करून भरणा दर्शवावी.

**4.299 हातपंप / विदयुतपंप दुरुस्ती व देखभाल वार्षिकवर्गणी वसुलीबाबत.**

**पंचायत समिती औसा, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 30) -** पंचायत समिती, औसा सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात हातपंप / विदयुतपंप देखभाल दुरूस्ती वर्गणीची तपासणी केली असता सन 2016-2017 मध्ये हातपंप / विदयुतपंप वार्षिक वर्गणी रक्कम रुपये 69,04,248/- एवढी रक्कम वसूल केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पापु.1002 प्र.क्र. 629 पा. पु. 07, दिनांक 22/05/2003, शासन शुद्धीपत्रक दिनांक 29/09/2009 तसेच शासन निर्णय क्रमांक देप्रों अ-1309/प्र.क्र.69 पपू-07, दिनांक 17/08/2009 व मुख्य अधीकारी यांचे पत्र दिनांक 29/06/2016 तसेच वेळोवेळी सुधारीत केलेल्या दरानुसार प्रती हातपंप रूपये 2,000/- व विद्युतपंप रुपये 5,000/- प्रतिवर्ष वसुल करून प्रत्येक ग्रामपंचायत बरोबर करारनामा करणे आवश्यक आहे, असा करारनामा केलेला नाही. दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रुपये 23,97,910/- वसूल होणे बाकी आहे.

2) पंचायत समिती अंतर्गत एकूण ग्रामपंचायती पैकी 709 हातपंप व 362 विदयुत पंप कार्यरत असल्याचे दर्शविले आहे. प्रत्यक्षात ज्या ग्रामपंचायती स्वःउत्पनातुन अथवा ग्रामपंचायत स्तरावरून दुरूस्ती करवून घेऊ शकतात, अशा ग्रामपंचायतीकडून वर्गणीची वसूली करण्याची आवश्यकता नसते परंतु, पंचायत समिती अंतर्गत अशा किती ग्रामपंचायती स्वःउत्पन्नातुन करण्यास तयार आहेत व किती पंचायतीने असा करार केलेला आहे. याबाबतचे कोणतेही लेखे उपलब्ध झालेले नाहीत. तरी लेख्याधारे अशी कार्यवाही करावी.

3) सदरील अनियमिततेबाबत अस पत्र क्रमांक 02, दिनांक 04/08/2017 अन्वये अर्धसमास पत्र क्रमाक 2, दिनांक 04/08/2017 अन्वये मागणी करुन देखील उत्तर दिलेले नाही.